दै. गोदातीर दि 11-02-2023

# नांदेडमध्ये भरदिवसा दरोडा टाकणाऱ्या राजस्थानी टोळीस रंगेहाथ पकडले

## डायल ११२ चा फायदा- एसपी श्रीकृष्ण कोकाटे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**नांदेड-** शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेदांतनगर येथे भर दिवसा दरोडा टाकण्याच्या तयारीने घरात घुसलेल्या राजस्थानी टोळीला पोलिसांनी शुक्रवारी अटक केली. त्यांच्याकडून तीन धारदार चाकू आणि चोरलेले सोन्याचे दागिने जप्त केले. तसेच विमानतळ पोलीस ठाण्यात झालेल्या फायरिंगच्याही आरोपींना स्थागुशाने अटक केल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. विशेष म्हणजे दरोडाप्रकरणी डायल - ११२ कॉलची सुविधा उपयुक्त ठरली.

शुक्रवार दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजताच्या सुमारास भाग्यनगर पोलीस ठाणे येथे डाएल- ११२ वर वेदांतनगर, मालेगाव रोड नांदेड येथून कॉल आला की, सकाळी १०.३० वाजताच्या सुमारासस मार्बल व्यापारी विकास शर्मा यांच्या घरामध्ये तीन चोरट्यांनी प्रवेश करून त्यांच्या पत्नीला आणि मुलाला जिवे मारण्याची धमकी देवून चाकुचा धाक दाखविला व अंगावर असलेले सोन्याचे मंगळसुत्र पेंडालसह जबरीने चोरून घेवून गेले आहेत. या माहितीवरून कर्तव्यावर असलेले पोलीस अंमलदार शिवराज गोणारकर, बोरकर यांनी तात्काळ प्रतिसाद देवून घटनास्थळी धाव घेवून आरोपीचा शोध घेण्यास सुरूवात केली.

वेदांतनगर भागामध्ये पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिध्देश्वर भोरे यांची सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे विमानतळ पोलीस ठाणे येथील गोळीबार घटनेतील आरोपींच्या शोधार्थ असलेले लिंबगाव ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार, हवालदार वाणी, मुंजाजी चवरे, खंडागळे तसेच इतवारा ठाण्याचे पोउपनि गणेश गोटके, हवालदार हाके, वजिराबाद ठाण्याचे हवलदार दत्तराम जाधव, शरदचंद्र चावरे, मनोज परदेशी, रमेश सूर्यवंशी, बालाजी



कदम यांनी सदर घटनेची माहिती मिळताच त्यांनी वेदांतनगर भागामध्ये आरोपींचा शोध घेण्यास सुरूवात केली. आरोपींचा शोध घेत असताना तीन व्यक्ती संशयितरित्या आढळले. त्यांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडून सोन्याचे मंगळसूत्र पेंडालसह व धारदार चाकू जप्त करण्यात आले. त्यांना याबाबत विचारणा करता त्यांनी वेदांतनगर भागामध्ये चोरी केल्याचे सांगितले. त्यांच्याकडे अधिक विचारणा करता सदर चोरी करताना आजुबाजूस वॉच करणारे त्यांचे इतर दोन साथीदाराबाबत माहिती दिली. त्यावरून त्यांना सुध्दा ताब्यात घेण्यात आले. प्रदीप शंकरलाल स्वामी (वय १९ वर्षे, व्यवसाय फरसीचे काम), पवनकुमार रामुराम जाठ (वय २४ वर्षे, व्यवसाय फरसीकाम), राजेंद्रकुमार सुरेशकुमार जाठ (वय २४ वर्षे, व्यवसाय फरसीकाम), पंकज शंकरलाल स्वामी (वय २१ वर्षे, व्यवसाय फरसी काम) आणि मनिष नेमीचंद सेन (वय २१ वर्षे, व्यवसाय फरसी काम) सर्व रा. नौसल तहसील दाताराम गड जि. सिकर, राजस्थान) यांच्याकडून सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र पेंडालसह किंमती ८० हजार रूपये व गुन्ह्यात वापरलेले हत्यार चाकू हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विजयकुमार कांबळे करत आहेत.

पत्रकार परिषदेला अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक अनंत्रे, लिंबगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार कांबळे, फौजदार गणेश गोटके आदींची उपस्थिती होती.